**लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा येथील स्मारकास निधी मंजूर करण्याबाबत.....**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन निर्णय क्र. स्मारक- ३१११/प्र. क्र. २५०/२९**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक: ९ मार्च, २०१८

**<u>वाचा</u>:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक- ३१११/प्र. क्र. २५०/२९, दिनांक १९.११.२०१५
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक- ३१११/प्र. क्र. २५०/२९, दिनांक २९.३.२०१६
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक- ३१११/प्र. क्र. २५०/२९, दिनांक १६.१२.२०१६
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. स्मारक- ३१११/प्र. क्र. २५०/२९, दिनांक २२.०९.२०१७
५) जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचे पत्र क्र. जिनिस/बा.देसाई स्मारक/२०१७/का-३/९१५, दिनांक ९.३.२०१८

**<u>प्रस्तावना</u>:-**

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा येथे स्मारक बांधण्यासाठी रु. ९९६.९० लाख (अक्षरी रुपये नऊ कोटी शहाण्णव लाख नव्वद हजार फक्त) इतक्या रकमेच्या आराखडे व अंदाजपत्रकास अनु. क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच अनु. क्र. २ ते ४ येथील शासन निर्णयान्वये अनुक्रमे रु. ८० लाख व रु. ३५६.९० लाख व रु. ४५०.०० लाख याप्रमाणे एकूण ८८६.९० लाख इतका निधी जिल्हाधिकारी, सातारा यांना मंजूर व वितरित करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांनी रु. ११०.०० लाख निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी दिनांक ९.३.२०१८ च्या पत्रान्वये केली आहे. त्यानुसार सदर स्मारकासाठी उर्वरित निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

लोकनेते बाळासाहेब देसाई यांचे दौलतनगर, ता. पाटण, जि. सातारा येथील स्मारकाच्या बांधकामासाठी रु. १, १०,००,००० (अक्षरी रुपये एक कोटी दहा लाख फक्त) इतका निधी वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा व तो मागणी क्रमांक -ए-४, मुख्य लेखाशीर्ष, २०५९ सार्वजनिक बांधकामे ८०- सर्वसाधारण ८००-राज्य योजना (०२) राष्ट्रपुरूष/थोर व्यक्ती यांची स्मारके व पुतळे यांचे बांधकाम (२०५९ ३१७७), ५३ मोठी बांधकामे खालील लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र. क्र. ७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परि. १४ मध्ये नमूद केल्यानुसार सदरचा निधी ठेव बांधकामाच्या स्वरुपात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग न करता चालू आर्थिक वर्षामध्ये स्मारकाच्या कामासाठी खर्च करण्याची जिल्हाधिकारी, सातारा यांनी दक्षता घ्यावी.

४. उपरोक्त निधीमधून खर्च करण्यासाठी उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (पश्चिम), सातारा (सांकेतांक क्रमांक २३०१००३४३७) यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर निधीच्या खर्चाची, निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल, मुंबई यांना सादर करण्याची तसेच महालेखापालांच्या लेख्यांशी खर्चमेळाची जबाबदारी जिल्हाधिकारी, सातारा यांची राहील.

५. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग-पाच मधील अनुक्रमांक-१, महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ अनुसार व वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७/प्र. क्र. ७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल, २०१७ मधील परिच्छेद ७ (क) व परिच्छेद ८ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९१५०३२४६७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chhaya Kiran
Wadte

Digitally signed by Chhaya Kiran Wadte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=f311bd8712a7b94b3b73d0e88ad01cf3a49c098bcd5f62e16e7135388baa523c,
serialNumber=5bac345149360802f8cd3e4ab4ec174f2fec1bff420e81931e638ee6cdfcc12d, cn=Chhaya Kiran Wadte
Date: 2018.03.09 15:04:11 +05'30'

**(छा. कि. वडते)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
३. मा.पालकमंत्री, जिल्हा सातारा यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
७. मा. विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
८. प्रधान सचिव (प्र. सु., र.व का.), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. जिल्हाधिकारी, सातारा
११. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई
१२. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-२ नागपूर
१३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ मुंबई
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता ), महाराष्ट्र-२ नागपूर
१५. जिल्हा कोषागार अधिकारी, सातारा
१६. निवासी उपजिल्हाधिकारी, सातारा
१७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, सातारा
१८. कक्ष अधिकारी (कार्या-२५ / कार्या-२६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. कक्ष अधिकारी (कार्यासन व्यय- ४/अर्थसंकल्प-१४), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. कार्यासन अधिकारी, (इमा-३), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
२१. निवडनस्ती कार्यासन २९, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई